# प्रेसनोट

दिनांक १९.०४.२०१८.

**काशिफ तारेख अहमद सय्यद, छाननी लिपीक, नेमणूक उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, लोहारा यांनी तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ७०,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही.**

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिली त्याची थोडक्यात हकिगत अशी की - तक्रारदार यांनी मौजे सास्तुर ता. लोहारा येथे शेत जमीन खरेदी केली आहे. खरेदी वेळी मुळ मालक यांनी शेत जमिनीची मोजणी वरुन हद्द कायम करुन कब्जा देणेबाबत ठरले होते. त्याप्रमाणे मोजणी फी भरुन मोजणी केलेली आहे. मोजणीचे नकाशावर हद्द कायम करुन नकाशाची नक्कल देण्यासाठी लोकसेवक सय्यद हे १,००,०००/- रुपये लाचेची मागणी करित आहेत.

त्यामुळे पोलीस अधीक्षक मा. डॉ. श्रीकांत परोपकारी, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. एस. आर. जिरगे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे, पोलीस निरीक्षक श्री. बी. जी. आघाव, पोलीस निरीक्षक श्री. व्ही. आर. बहिर यांनी दिनांक १८.०४.२०१८ रोजी तक्रारीची शहानिशा केली. लोकसेवक काशिफ तारेख अहमद सय्यद, छाननी लिपीक, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय लोहारा यांनी वर नमूद कामासाठी तडजोडी अंती तक्रारदार यांचेकडुन आज दि. १९.०४.२०१८ रोजी ७०,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने अे.सी.बी. युनिट उस्मानाबाद टिमच्या सहाय्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले. सदरची लाचेची रक्कम ही मोघा रोड येथील रुपेश बिअर बार, लोहारा येथे स्विकारण्यात आलेली आहे. यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास श्री. बी. जी. आघाव, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद हे करित आहेत.

ॲन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाइल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, अे.सी.बी. विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :- ९६३७०६१४७८, **टोल फ्री क्र. १०६४**, दूरध्वनी क्र.- ०२४७२-२२२८७९

**प्रति,**

मा.संपादक, दैनिक

कृपया वरील वृत्त आपल्या दैनिकामध्ये प्रसिध्द करावे ही विनंती.

19/04/18

**(बी. व्ही. गावडे)**

पोलीस उप अधीक्षक,

ॲन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद.